महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

क्र. मासंवि/मावक/१०२२४
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : managerbcrrc@gmail.com
Website : www.mahadiscom.in

**दिनांक : ०५/०५/२०१८**

# परिपत्रक

**विषय :** शैक्षणिक आणि सामाजिकदृष्टया मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार दिलेल्या तदर्थ नियुक्त्यांना मा. उच्च न्यायालयाच्या दि. ०२ मे, २०१८ च्या अंतरिम आदेशाच्या अनुषंगाने मुदतवाढ देण्याबाबत.

**संदर्भ :** १) प्रशासकीय परिपत्रक क्र. ४९५ दि. ३१.०७.२०१४
२) प्रशासकीय परिपत्रक क्र. ५०४ दि. ०७.०४.२०१५
३) प्रशासकीय परिपत्रक क्र. ५३४ दि. ०४.०४.२०१६
४) परिपत्रक क्र. मासंवि/मावक/२७५९६ दि. १३.११.२०१७
५) परिपत्रक क्र. मासंवि/मावक/३११४१ दि. २०.१२.२०१७
६) सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-२/२०१३/१६-ब, दि.०२.१२.२०१५
७) सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-४/२०१३/१६-ब, दि.१७.०५.२०१७
८) सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-४/२०१३/१६-ब, दि.०९.११.२०१७
९) सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-४/२०१३/१६-ब, दि.०२.१२.२०१७
१०) सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-४/२०१३/१६-ब, दि.०४.०५.२०१८

----------------

महावितरणमध्ये 'विद्युत सहाय्यक' या संवर्गाची रिक्त पदे भरण्याकरिता ०३ वर्षाच्या निश्चित कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने निवड करण्याकरिता जाहिरात क्र. ०५/२०१४ ही माहे ऑगष्ट २०१४ मध्ये दिलेली होती. त्यास अनुसरुन काही उमेदवारांनी ईएसबीसी प्रवर्गातून अर्ज सादर केले होते. तथापि, महाराष्ट्र शासन निर्णय दि. २१.०२.२०१५ अन्वये नमूद केल्याप्रमाणे ईएसबीसी आरक्षणासंबंधीची रिट याचिका क्र. ३१५१/ २०१४ मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित असल्याने काही ईएसबीसी उमेदवारांनी सदर जाहिराती अंतर्गत निवड होण्याकरिता औरंगाबाद खंडपीठाकडे याचिका क्र. ५२९०/२०१७ व इतर संलग्न याचिका दाखल केल्या होत्या. त्यास अनुसरुन महावितरण कंपनीकडून घेतलेल्या निर्णयानुसार "ज्या उमेदवारांचे सरासरी गुण प्रतिक्षा यादीतील खुल्या प्रवर्गाच्या शेवटच्या उमेदवारापेक्षा (६७.५४% व त्यापेक्षा जास्त) असतील तसेच जाहिरातीस अनुसरुन दि. ३०.०९.२०१४ रोजी कमाल वयोमर्यादा २७ वर्षे असेल अशा उमेदवारांनी निवड करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

२. मा. उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ३१५१/२०१४ वर दि. ०७.०४.२०१५ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशानुसार तदर्थ नियुक्त्या दि. ०३ मे, २०१८ पर्यंत पुढे चालू ठेवण्यासंदर्भात आदेश निर्गमित करण्यात आले होते. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे प्रलंबित असलेल्या जनहित याचिका क्र. १४९/२०१४ यामध्ये शासनाने दाखल केलेल्या दिवाणी अर्ज क्र. २५/२०१८ वर मा. उच्च न्यायालयाने दि. ०२.०५.२०१८ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशानुसार संदर्भीय शासन निर्णय क्र. १० अन्वये खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

> "मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि. ०७.०४.२०१५ रोजीच्या अंतरिम आदेशानुसार उपरोक्त संदर्भिय क्र. ६ येथील शासन शुध्दीपत्रकान्वये शासकीय व निमशासकीय सेवेतील रिक्त पदांसाठी दि. १४.११.२०१४ पूर्वी, शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणासह दिलेल्या जाहिरातीनुसार, अशा पदांवर मा. उच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय होईपर्यंत खुल्या प्रवर्गातील, गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांमधून तात्पुरत्या स्वरुपात जास्तीत जास्त ११ महिन्यांच्या कालावधीसाठी किंवा सदर न्यायालयीन प्रकरणाचा अंतिम निर्णय, यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीकरिता, तदर्थ स्वरुपात दिलेल्या नेमणुका, मा. उच्च न्यायालयाच्या दि. ०२.०५.२०१८ च्या अंतिम आदेशानुसार पुढील सहा महिने म्हणजे दि. ०३/११/२०१८ पर्यंत चालू ठेवण्यात याव्यात."

३. सदर शासन निर्णयातील सूचना/तरतुदींचे काटेकोरपणे पालन होण्यासाठी सर्व संबंधीत अधिकाऱ्यांनी दि. ०४ मे, २०१८ च्या शासन निर्णयाचे अवलोकन करावे व सदर निर्णयातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. सदर शासन निर्णयाची प्रत सोबत माहितीस्तव जोडण्यात येत आहे.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या इन्ट्रानेटवर (RAPDRP Portal) उपलब्ध करण्यात आलेले आहे.

सोबत : वरीलप्रमाणे.

(संदेश हाके)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

G:\ESBC.docx

**शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार दिलेल्या तदर्थ नियुक्त्यांना मा. उच्च न्यायालयाच्या दि.२ मे, २०१८ च्या अंतरीम आदेशाच्या अनुषंगाने मुदतवाढ देण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन निर्णय क्रमांक: बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-४/२०१३ /१६-ब**

मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

दिनांक : ४ मे, २०१८.

**वाचा:-**

१. सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३, दिनांक ९ जुलै, २०१४. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अध्यादेश, २०१४.

२. शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.सीबीसी-१०/२०१३/प्र.क्र.३५/ मावक, दि.१५ जुलै,२०१४.

३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-२/२०१३ /१६-ब, दि.२४.७.२०१४.

४. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-२/२०१३ /१६-ब, दि.२१.२.२०१५.

५. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अधिनियम, २०१४, ( महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १/२०१५)

६. सामान्य प्रशासन विभाग, शासन शुद्धिपत्रक क्रमांक बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-२/२०१३ /१६-ब,दि.२ डिसेंबर,२०१५

७. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-४/२०१३ /१६-ब,दि.१७ मे,२०१७

८. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-४/२०१३ /१६-ब,दि.९ नोव्हेंबर,२०१७

९. सामान्य प्रशासन विभाग, शासन शुध्दीपत्रक बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-४/२०१३ /१६-ब,दि.२ डिसेंबर,२०१७

**प्रस्तावना :-**

मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्रमांक ३१५१/२०१४ प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिनांक ७.४.२०१५ रोजीच्या आदेशानुसार महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १/२०१५ या अधिनियमास स्थगिती दिली होती व मा.उच्च न्यायालयाने दिलेले आदेश

विचारात घेता, या विभागाच्या संदर्भ क्र.६ येथील दि.२/१२/२०१५ च्या शासन शुद्धिपत्रकान्वये खालीलप्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करण्यात आले होते.

**अ)** शासकीय व निमशासकीय सेवेतील रिक्त पदांसाठी दि.१४.११.२०१४ पूर्वी, शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणासह जाहिरात दिली असल्यास, अशा पदांवर मा. उच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय होईपर्यंत खुल्या प्रवर्गातील, गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांमधून तात्पुरत्या स्वरूपात जास्तीत जास्त ११ महिन्यांच्या कालावधीसाठी किंवा सदर न्यायालयीन प्रकरणाचा अंतिम निर्णय ,यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीकरिता,तदर्थ स्वरूपात नेमणुका करण्यात याव्यात.

**ब)** उपरोक्त नेमणूका या मा.उच्च न्यायालय,मुंबई येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्र.३१५१/२०१४ श्री.संजीत शुक्ला विरूद्ध महाराष्ट्र शासन व इतर संलग्न याचिका या प्रकरणी होणा-या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून करण्यात येतील,ही बाब संबंधितांच्या नियुक्ती आदेशात स्पष्टपणे नमूद करण्यात यावी.

वरिल आदेशास अनुसरून देण्यात आलेल्या नियुक्त्यांचा ११ महिन्यांचा कालावधी संपुष्टात आल्यामुळे सदर नियुक्त्यांना मुदतवाढ देण्यासंदर्भात राज्य शासनाच्या वतीने मा.उच्च न्यायालय,मुंबई येथे वेळोवेळी दाखल करण्यात आलेल्या दिवाणी अर्जावर मा.उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या अंतरिम आदेशानुसार उपरोक्त संदर्भ क्र.७ ते ८ येथिल शासन निर्णयानुसार व संदर्भ क्र.९ येथील शासन शुध्दीपत्रकानुसार , या तदर्थ नियुक्त्या दि.३ मे,२०१८ पर्यत पुढे चालू ठेवण्यासंदर्भात आदेश निर्गमित करण्यात आले होते.

उपरोक्त तदर्थ नियुक्त्यांचा कालावधी दि.३ मे,२०१८रोजी संपुष्टात आला असल्यामुळे तसेच मा.उच्च न्यायालय,मुंबई येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्र.३१५१/२०१४ श्री.संजीत शुक्ला विरूद्ध महाराष्ट्र शासन व इतर संलग्न याचिका या प्रकरणी अद्याप मा.उच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय न झाल्यामुळे सदर नियुक्त्यांना आणखी मुदतवाढ देण्याबाबत राज्य शासनाच्यावतीने मा.उच्च न्यायालय ,मुंबई येथे दिवाणी अर्ज क्र.२५/२०१८ दाखल आला होता.सदर दिवाणी अर्जावर मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी दि.२ मे,२०१८ रोजी दिलेल्या आदेशानुसार सदर तदर्थ नियुक्त्यांना मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे प्रलंबित असलेल्या जनहित याचिका क्रमांक १४९/२०१४ यामध्ये शासनाने दाखल केलेल्या दिवाणी अर्ज क्र.२५/२०१८ वर मा.उच्च न्यायालयाने दि.२.५.२०१८ रोजी दिलेले अंतरिम आदेश खालीलप्रमाणे आहे :-

**Heard the learned counsel for the parties on the Civil Application No. 25 of 2018. On due consideration, the Civil Application is disposed of by extending the time fixed in the order dated 10th November, 2017 by further period of six months from today.**

२. मा.उच्च न्यायालयाचे उपरोक्त अंतरिम आदेश विचारात घेऊन शासन खालील प्रमाणे आदेश देत आहे.

मा.उच्च न्यायालय,मुंबई यांच्या दि.७.४.२०१५ रोजीच्या अंतरिम आदेशानुसार उपरोक्त संदर्भाधिन क्र.६ येथिल शासन शुद्धिपत्रकान्वये शासकीय व निमशासकीय सेवेतील रिक्त पदांसाठी दि.१४.११.२०१४ पूर्वी, शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणासह दिलेल्या जाहिरातीनुसार , अशा पदांवर मा. उच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय होईपर्यंत खुल्या प्रवर्गातील, गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांमधून तात्पुरत्या स्वरूपात जास्तीत जास्त ११ महिन्यांच्या कालावधीसाठी किंवा सदर न्यायालयीन प्रकरणाचा अंतिम निर्णय ,यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीकरिता,तदर्थ स्वरूपात दिलेल्या नेमणुका, मा.उच्च न्यायालयाच्या दि.२.५.२०१८ च्या अंतरिम आदेशानुसार पुढील सहा महिने म्हणजे दि.३ नोव्हेंबर, २०१८ पर्यंत चालू ठेवण्यात याव्यात.

३. सदर शासन निर्णय राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, सेवामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, शैक्षणिक संस्था,स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, महामंडळे,शासकीय अनुदान प्राप्त संस्था,विद्यापीठे,सहकारी संस्था , शासकीय उपक्रम व शासनाच्या अधिपत्याखालील किंवा शासनाने अनुदान दिलेली मंडळे इत्यादींना लागू राहील. याबाबत सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रिय कार्यालयांना/आस्थापनांना योग्य ते आदेश निर्गमित करावेत व सदर आदेशाची संबंधित प्रशासकिय विभागाने तातडीने अंमलबजावणी करावी.

४. सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१८०५०४१५५२५५०७०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sudam Eknath Andhale

Digitally signed by Sudam Eknath Andhale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=257966df2620df1403d35023802519a4fbdcfcd894791eba41c2aef2b4c4b975, serialNumber=7b57fee59f0e7101b822a49c72629c21bf9b4dc0bde136817ee19b6b347e77f4, cn=Sudam Eknath Andhale
Date: 2018.05.04 16:01:10 +05'30'

( सु. ए. आंधळे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१.राज्यपाल यांचे सचिव,
२.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३.सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४.मा. विरोधी पक्षनेता,विधानपरिषद
५.मा. विरोधी पक्षनेता,विधानसभा
६.सर्व विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य
७.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य.
८.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
९.प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानसभा)
१०.प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानपरिषद)
११.सर्व विभागीय आयुक्त,
१२.सर्व सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष)
१३.सर्व जिल्हाधिकारी,

१४.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१५.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,
१६.प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
१७.प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१८.प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई,नागपूर,औरंगाबाद,
१९.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
२०.सचिव,राज्य निवडणूक आयोग,
२१.सचिव,राज्य माहिती आयोग,
२२.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
२३.राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२४.सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२५.सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२६.संचालक, समाजकल्याण, पुणे,
२७.आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
२८.संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
२९.संचालक, सेवायोजन, मुंबई,
३०.महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
३१.महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
३२.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३३.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
३४.सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
३५.सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्त्याखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना सदर शासन निर्णयाची प्रत, त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे पाठवून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.
३६.ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई
३७.सर्व मान्यता प्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये,महाराष्ट्र राज्य,
३८.निवड नस्ती, कार्यासन १६-ब.

***********